# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 15/03/2021 (सोमवार)

(दुपार)

---

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. बोरी :– फिर्यादी सरतर्फे पोउपनि संजय भारती हे पो.स्टे. बोरी येथे कार्यरत आहेत. फिर्यादी हे दिनांक 13/03/2021 रोजी दिवसभर आपले तपासाचे काम करून रात्री 21.00 वा. चे रात्रगिणती करून जे आपले घरी परत गेले होते. ते आपले घरी हजर असतांना रात्री 23.00 वा. दरम्यान लोकमत कॉलनी, तुरकमारी येथे राहणारे शामराव बाबुलाल कटरे यांनी त्यांना फोनव्दारे माहिती दिली की, ''गेट नं 02 जवळील रोडवर 4 इसम हे दारू पिवून दारूच्या नशेत गेटवर असलेला सेक्युरीटी गार्ड अरविंद भोयर याचे सोबत झगडा भांडण करीत आहे'' असे सांगितल्यावरून फिर्यादीने डयुटीचा गणवेष टाकून गेट जवळ गेले व त्यांनी आरोपीतांना म्हटले की, ''तुम्ही येथे दारू पिवून गार्ड सोबत का झगडा भांडण कशाला करीत आहे.'' तसेच तुमचे नाव काय व तुम्ही कुठे राहता? अशी विचारणा केली असता त्यातील आरोपी नामे– 1) राजेन्द्र जयेंद्र कुतीरवार, वय 18 वर्ष, रा. सातगांव रिधोरा बुटटीबोरी, 2) मंगेश महेश समरीत, वय 18 वर्ष, रा. निखाडे लेआउट सातगांव बुटटीबोरी, 3) आकाश क्रिष्णा तुमडाम, वय 26 वर्ष, रा. सातगांव रिधोरा बुटटीबोरी व एक विधीसंर्घषग्रस्त बालक यांनी फिर्यादीला म्हटले की, ''तुमचे आमच्या सोबत काय घेणे देणे आहे, तुम्ही असाल पोलीस सब इन्सपेक्टर'' असे म्हणून प्रथम फिर्यादीला शिवीगाळ केली. यानंतर आरोपीतांनी सिक्युरीटी गार्ड अरविद भोयर याचे हातातील लाकडी काठी त्यातील एका आरोपीने हिसकावून प्रथम अरविंद भोयर याचे पायावर व कमरेवर मारली. तसेच त्याला हातबुक्कीने मारपीट करीत असतांना फिर्यादी हे मध्यस्ती करीता आले असता त्यातील एका आरोपीने फिर्यादीला काठीने उजव्या पायावर मारले व सर्व आरोपीतांनी त्यांना अश्लील शिवीगाळ करून ''हम पुलीस को नही जानते'' असे म्हणुन इतर आरोपीतांनी फिर्यादीला लाताबुक्कीने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या उजव्या पायाला सुजन आली आहे. फिर्यादी हे सरकारी गणवेषात असुन सुदधा व पोलीस सब इन्सपेक्टर असल्याचे त्यांना सांगून सुद्धा गार्डला वाचविण्याकरिता व भांडण सोडविण्या करिता गेले असता आरोपीतांनी फिर्यादी सोबत भांडण व शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा निर्माण करून तेथील दोन गार्डचे डाव्या हाताला, डोक्याला, पाठीला काठीने व हातबुक्याने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 353, 333, 323, 504, 506, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि श्री आरती उघडे पोस्टे बोरी मो.क्र 8355947473 हे करीत आहे.

### चोरी

पो. स्टे. भिवापुर :– अंतर्गत अर्धा किमी अंतरावर मौजा कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर येथे दिनांक 12/03/2021 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शामराव बाबुराव कामडी, वय 35 वर्षे, रा. तास ता. भिवापुर, अडतीया कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर हे कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर येथे काही कामा निमीत्त आले असता त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर समोर गाडी उभी करून गाडीच्या डीक्की मध्ये नगदी 40,000/–रू. तसेच बॅक ऑफ इंडीयाचे पासबुक व श्रीकृष्ण बॅकेच्या दोन चेक बुक तसेच बाजार समीतीचे कास्तकार बुक व बिल बुक ठेवुन डिक्कीला मुलुप लावुन कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या ऑफीस मध्ये गेले. अर्ध्या

तासाने फिर्यादी परत आले असता त्यांना गाडीच्या डीक्कीचा कुलुप तुटलेला दिसला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या गाडीचा कुलुप तोडुन वरील नगदी व दस्ताएवज चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चंद्रकांन्त रेवतकर 9823719197 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर